
सकाळ

# 'रवळनाथ'चा व्यवसाय ५२९ कोटींवर

## संस्थापक एम. एल. चौगुले; कोरोना काळातही संस्थेने केली उत्तम कामगिरी

**सकाळ वृत्तसेवा**



एम. चौगुले

गडहिंग्लज, ता. ५ : सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटीच्या वार्षिक व्यवसायात ८६ कोटी ५४ लाखांनी वाढ झाली असून वार्षिक व्यवसाय ५२९ कोटी ५७ लाख इतका झाला आहे. कोरोनाच्या सावटाखालील या आर्थिक वर्षातही संस्थेच्या उत्तम कामगिरीचा चढता आलेख कायम राहिला आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक एम. एल. चौगुले यांनी दिली.

### कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी

कोरोनामुळे संस्था आर्थिक अडचणीत येऊ नये म्हणून कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षात २० टक्के महागाई भत्ता व वेतनवाढ स्वेच्छेने नाकारला होता; परंतु त्यांच्याच कष्टामुळे संस्थेची घोडदौड कायम राहिली आहे. त्यामुळे २०२०-२१ मध्ये कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी आणि २० टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय संचालकांनी घेतल्याचे चौगुले यांनी सांगितले.

चौगुले म्हणाले, ''३१ मार्चअखेर संस्थेची सभासद संख्या ८०६३ इतकी आहे. एकूण ३१० कोटी ८७ लाखांच्या ठेवी, तर २१८ कोटी ७० लाखांची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३४५ कोटी ७० लाखांचे असून एकूण गुंतवणूक १११ कोटी १४ लाखांची आहे. वार्षिक व्यवसाय ५२९ कोटी ५७ लाखांचा झाला असून १ कोटी ४० लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. सध्या एस. एम. एस. बँकिंग, मायक्रो एटीएम, डेबिट कार्ड याद्वारे डिजिटल सेवा दिली जाते. त्याशिवाय पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल ॲटोमेटेड क्लिअरिंग हाऊस (नॅच) ची सेवा सुरू आहे. लवकरच संस्थेला आयएफएससी कोडही मिळेल.

गडहिंग्लजमध्ये संस्थेची स्वमालकीची प्रधान कार्यालयाची प्रशस्त इमारत आहे. एकूण ९ पैकी गडहिंग्लज, कोल्हापूर, जयसिंगपूर व कुडाळ या शाखाही स्वमालकीच्या इमारतीत आहेत. सभासद नोंदणी, ठेवी संकलन व कर्ज वितरणात बेळगाव शाखेने सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यासाठी शाखा चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे, सर्व सल्लागार, कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सर्व संचालक, सर्व शाखांचे चेअरमन व सल्लागार, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, सर्व शाखाधिकारी, कर्मचारी यांच्यासह सभासद, ठेवीदार, कर्जदार व ग्राहकांचे मोलाचे सहकार्य मिळाले.''

Kolhapur, Gadhinglaj-Today
06/04/2021 Page No. 3

लोकमत

# ‘रवळनाथ’च्या ठेवीत ५५ कोटींनी वाढ

## चौगुले : कोरोनातही उत्तम कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

गडहिंग्लज : गेल्या आर्थिक वर्षात श्री रवळनाथ को-ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटीच्या ठेवीमध्ये ५५ कोटींनी वाढ झाली. ३१ मार्च २०२१ अखेर संस्थेत ३११ कोटींच्या ठेवी आहेत. कोरोनाच्या सावटाखाली या वर्षातदेखील संस्थेची कामगिरी नेहमीप्रमाणेच उत्तम राहिली आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



चौगुले म्हणाले, ३१ मार्चअखेर संस्थेची सभासद संख्या ८०६३ आहे. एकूण ठेवी ३११ कोटी तर २१९ कोटींची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३४६ कोटींचे असून, एकूण गुंतवणूक १११ कोटींची आहे. १ कोटी ४० लाखाचा निव्वळ नफा झाला आहे.

### दोन वेतनवाढी

कोरोनामुळे संस्था आर्थिक अडचणीत येऊ नये म्हणून कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षात २० टक्के महागाई भत्ता आणि वेतनवाढ स्वेच्छेने नाकारला होता; परंतु त्यांच्याच कष्टामुळे संस्थेची घोडदौड कायम राहिल्यामुळे यावर्षी त्यांना दोन वेतनवाढी आणि २० टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.

सध्या एसएमएस बँकिंग, सीबीएस, मायक्रो एटीएम, डेबिट कार्ड व नॅशनल ऑटोमेटेड क्लिअरिंग हाऊस (नॅच) ही सेवा उपलब्ध आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष वासुदेव मायदेव, सीईओ दत्तात्रय मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, सर्व संचालक, शाखाध्यक्ष, सल्लागार, शाखाधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

पुढारी

# 'रवळनाथ'ला १ कोटी ४० लाखांचा नफा

## एम. एल. चौगुले : कोरोना काळातही उत्तम कामगिरीचा चढता आलेख कायम

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**



एम. एल. चौगुले

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला १ कोटी ४० लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. कोरोनाच्या सावटाखालील या वर्षात देखील संस्थेच्या उत्तम कामगिरीचा चढता आलेख कायम राहिला आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, ३१ मार्चअखेर संस्थेची सभासद संख्या ८,०६३ इतकी आहे. एकूण ३१० कोटी ८७ लाखांच्या ठेवी, तर २१८ कोटी ७० लाखांची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३४५ कोटी ७० लाखांचे असून, एकूण गुंतवणूक १११ कोटी १४ लाख इतकी आहे. एकूण वार्षिक व्यवसाय ५२९ कोटी ५७ लाखांचा झाला असून, १ कोटी ४० लाखांचा निव्वळ नफा झाला आहे.

संस्थेची स्वत:ची वेबसाईट असून, त्यावरून वार्षिक अहवालासह दैनंदिन ताज्या घडामोडींची माहिती दिली जाते. सध्या एसएमएस बँकिंग, सीबीएस, मायक्रो एटीएम, डेबिट कार्ड याद्वारे डिजिटल सेवा दिली जाते. त्याशिवाय पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल ऑटोमेटेड क्लिअरिंग हाऊस (नॅच) ही सेवा सुरू आहे. संस्थेला लवकरच आयएफएससी कोडही मिळेल.

दरम्यान, सन २०२०-२१ या वर्षात कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी आणि २० टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे, असेही चौगुले यांनी सांगितले. गडहिंग्लज येथे संस्थेची स्वमालकीची प्रधान कार्यालयाची प्रशस्त इमारत आहे. एकूण नऊपैकी गडहिंग्लज, कोल्हापूर, जयसिंगपूर व कुडाळ या शाखादेखील स्वमालकीच्या इमारतीमध्ये आहेत.

संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सर्व संचालक, सर्व शाखांचे चेअरमन व सल्लागार, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, सर्व शाखाधिकारी व कर्मचारी यांच्यासह सभासद, ठेवीदार, कर्जदार व ग्राहक यांचे मोलाचे सहकार्य लाभले, असल्याचे चौगुले यांनी सांगितले.

### बेळगाव शाखा प्रथम...

सभासद नोंदणी, ठेवी संकलन व कर्ज वितरणात बेळगाव शाखेने सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. त्यासाठी शाखा चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे, सर्व सल्लागार व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

My Kolhapur Edition
Apr 6, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

तरुण भारत मंगळवार, ६ एप्रिल २०२१

# 'रवळनाथ'च्या कर्ज वितरणात ३२ कोटींची वाढ

## अध्यक्ष एम. एल. चौगुले यांची माहिती : कोरोना वर्षातही कामगिरीचा आलेख कायम

**प्रतिनिधी**
गडहिंग्लज

कोरोनाच्या संकटाचा सर्वाधिक परिणाम बांधकाम क्षेत्रावर झाला तरी देखील सुलभ व तत्पर अर्थसहाय्याच्या पद्धतीमुळेच श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कर्ज वितरणात ३२ कोटींनी वाढ झाली. ३१ मार्च अखेर २१९ कोटींची कर्जे दिली आहेत. त्यामुळे कोरोनाच्या सावटात देखील संस्थेच्या कामगिरीचा चढता आलेख कायम राहिला आहे. अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

श्री. चौगुले म्हणाले, सभासद संख्या ८०६३ इतकी आहे. एकूण ३१० कोटी ८७ लाखाच्या ठेवी तर २१८ कोटी ७० लाखाची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३४५ कोटी ७० लाखाचे असून एकूण गुंतवणूक १११ कोटी १४ लाख इतकी आहे. एकूण वार्षिक व्यवसाय ५२९ कोटी ५७ लाखाचा झाला असून १ कोटी ४० लाखाचा निव्वळ नफा झाला आहे. संस्थेची स्वत:ची वेबसाईट असून त्यावरुन वार्षिक अहवालासह दैनंदिन ताज्या घडामोडींची माहिती दिली जाते. लवकरच संस्थेला आयएफएससी कोडही मिळणार असल्याचे सांगितले.

गडहिंग्लज येथे संस्थेची स्वमालकीची प्रधान कार्यालयाची प्रशस्त इमारत आहे. एकूण ९ पैकी गडहिंग्लज, कोल्हापूर, जयसिंगपूर व कुडाळ या शाखादेखील स्वमालकीच्या इमारतीमध्ये आहेत. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, मुख्य कार्यकारी अधिकारी



डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, सर्व संचालक, चेअरमन व सल्लागार यांचे सहकार्य लाभल्याचे श्री. चौगुले यांनी सांगितले. तसेच सभासद नोंदणी, ठेवी संकलन व कर्ज वितरणात बेळगाव शाखेने सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. त्यासाठी चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे यांच्यासह सर्वांनी परिश्रम घेतल्याचे त्यांनी सांगितले.

### कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी

**कोरोनामुळे संस्था आर्थिक अडचणीत येवू नये म्हणून कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षात २० टक्के महागाई भत्ता आणि वेतनवाढ स्वेच्छेने नाकारुन त्याग केला होता. परंतु त्यांच्याच कष्टामुळे संस्थेची यशस्वी घोडदौड कायम राहिली आहे. त्यामुळे सन २०२०-२१ या वर्षात कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी आणि २० टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. असे श्री. चौगुले यांनी यावेळी सांगितले.**

पुढारी
बेळगाव / संदीप तारिहाळकर


# ‘रवळनाथ’ ला १.४० कोटींचा नफा

## चेअरमन एम. एल. चौगुले यांची माहिती; कोरोना वर्षातही उत्तम कामगिरी

**बेळगाव : पुढारी वृत्तसेवा**

रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटीला १ कोटी ४० लाखांचा निव्वळ नफा झाला. कोरोना काळात संस्थेने उत्तम कामगिरी करून प्रगतीचा चढता आलेख कायम ठेवल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, ३१ मार्चअखेर संस्थेची सभासद संख्या ८०६३ इतकी आहे. एकूण ३१० कोटी ८७ लाख रुपयांच्या ठेवी तर २१८ कोटी ७० लाखांची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३४५ कोटी ७० लाख रुपये असून एकूण गुंतवणूक १११ कोटी १४ लाख रुपये आहे. वार्षिकउलाढाल ५२९.९७ कोटी झाला असून १ कोटी ४० लाखांचा निव्वळ नफा झाला आहे.



एम. एल. चौगुले

संस्थेची स्वत:ची वेबसाईट असून त्यावर सर्व माहिती दिली जाते. सध्या एसएमएस, बँकिंग, सीबीएस, मायक्रो एटीएम, डेबिट कार्ड याद्वारे डिजिटल सेवा दिली जाते. शिवाय पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल ऑटोमेटेड क्लिअरिंग हाऊस (नॅच) सेवा सुरू आहे. लवकरच संस्थेला आयएफएससी कोडही मिळेल. गडहिंग्लज प्रधान कार्यालयाची प्रशस्त इमारत आहे.

एकूण ९ पैकी गडिंग्लज, कोल्हापूर, जयसिंगपूर व कुडाळ या शाखादेखील स्वमालकीच्या इमारतीत आहेत. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, व्यवस्थापकशिवानंदघुगरेतसेचसर्वांचे सहकार्य लाभत असल्याचे चौगुले यांनी सांगितले. कोरोनामुळे संस्था आर्थिक अडचणीत येऊ नये म्हणून कर्मचाऱ्यांनी गत वर्षात २० टक्के महागाई भत्ता आणि वेतनवाढ स्वेच्छेने नाकारून त्याग केला होता. परंतु, कोरोना काळातही संस्थेची यशस्वी घोडदौड कायम राहिली आहे. त्यामुळे २०२०-२१ या वर्षात कर्मचाऱ्यांना दोनवेळा वेतनवाढ आणि २० टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतल्याचेही चौगुले यांनी सांगितले.

### बेळगाव शाखा प्रथम

सभासद नोंदणी, ठेवी संकलन व कर्ज वाटपात बेळगाव शाखेने सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. त्यासाठी शाखा चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे व सल्लागार व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

Belgaum Edition
Apr 6, 2021 Page No. 11
newspaper.pudhari.co.in

रील
: ठाकरे


मुंबई, ता.
: राज्यातील
धिक प्रभावित
जिल्ह्यांसाठी
कोटी लसींची
णी करीत २५
वरील सर्वांना
ुख्यमंत्री उद्धव
नरेंद्र मोदींना
ाज यासंदर्भात
ई, पुणे, ठाणे,
नागपूर ही
प्रभावित शहरे
ाज्य सरकारने
संकटावर मात
ूद केले आहे.
करे यांच्याशीही
चर्चा केली.
ळखा मोठ्या
ला बसल्याचे
वयोगटालाही
ी आवश्यक
ंपुढील सर्वांना
स द्या
ाहे.

# 'रवळनाथ'चा वार्षिक व्यवसाय ५२९ कोटींवर

## चौगुले; कोरोना काळातही केली उत्तम कामगिरी

गडहिंग्लज, ता. ५ : सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटीच्या वार्षिक व्यवसायात ८६ कोटी ५४ लाखांनी वाढ झाली असून वार्षिक व्यवसाय ५२९ कोटी ५७ लाख इतका झाला आहे. कोरोनाच्या सावटाखालील या आर्थिक वर्षातही संस्थेच्या उत्तम कामगिरीचा चढता आलेख कायम राहिला आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, ''संस्थेकडे एकूण ३१० कोटी ८७ लाखांच्या ठेवी, तर २१८ कोटी ७० लाखांची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३४५ कोटी ७० लाखांचे असून एकूण गुंतवणूक १११ कोटी १४ लाखांची आहे. सभासद नोंदणी, ठेवी संकलन व कर्ज वितरणात बेळगाव शाखेने सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.



चौगुले

त्यासाठी शाखा चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे, सर्व सल्लागार, कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सर्व संचालक, सर्व शाखांचे चेअरमन व सल्लागार, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, सर्व शाखाधिकारी, कर्मचारी यांच्यासह सभासद, ठेवीदार, कर्जदार व ग्राहकांचे मोलाचे सहकार्य मिळाले.''

### कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी

यंदा कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी आणि २० टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतल्याचे चौगुले यांनी यावेळी सांगितले.

REDMI NOTE 8
48MP QUAD CAMERA

# रवळनाथचा वार्षिक व्यवसाय ५३० कोटी

## एम. एल. चौगुले; कोरोना वर्षातही उत्तम कामगिरी

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या वार्षिक व्यवसायात ८६ कोटी ५४ लाखांनी वाढ झाली असून एकूण वार्षिक व्यवसाय ५२९ कोटी ५७ लाख इतका झाला आहे. कोरोनाच्या सावटाखालील या आर्थिक वर्षातदेखील संस्थेच्या उत्तम कामगिरीचा चढता आलेख कायम राहिला असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, ३१ मार्चअखेर संस्थेची सभासद संख्या ८०६३ इतकी आहे. एकूण ३१० कोटी ८७ लाखांच्या ठेवी तर २१८ कोटी ७० लाखांची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३४५ कोटी ७० लाखांचे असून एकूण गुंतवणूक १११ कोटी १४ लाख इतकी आहे. एकूण वार्षिक व्यवसाय ५२९ कोटी ५७ लाखांचा झाला असून १ कोटी ४० लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. संस्थेची स्वतःची वेबसाईट असून त्यावरून वार्षिक अहवालासह दैनंदिन ताज्या घडामोडींची माहिती दिली जाते.



एम. एल. चौगुले